गुरुवार, १२ जून २०१४ तरुण भारत

# विद्यापीठातील अध्यासनांचे यंदा दुसरे वर्ष

## उत्स्फूर्त प्रतिसाद : १ जुलै पासून सुरुवात, दिग्गजांचे मार्गदर्शन



**पणजी : पत्रकार परिषदेत माहिती देताना गोवा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सतीश शेटये. बाजूला डॉ. मारिया आरोरा कुतो, प्रा. व्ही. पी. कामत व रामराव वाघ.** उमेश धाणस्तारकर

प्रतिनिधी
पणजी

गोवा विद्यापीठातर्फे गेल्यावर्षीपासून सुरू करण्यात आलेल्या विशेष अध्यसनांना विद्यार्थी तसेच नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद लाभल्याने यंदाही अधिक दर्जेदार पद्धतीने हा अध्यासन उपक्रम राबविण्यात येणार आहे. विशेष म्हणजे विद्यापीठ कॅम्पसूच्या सीमा ओलांडून इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही याचा लाभ देण्यात येईल, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सतीश शेटये, निबंधक विजयेंद्र कामत, मानद संचालक डॉ. मारिया कुटो आणि अध्यासनांचे मुख्य समन्वयक प्रा. रामराव वाघ उपस्थित होते. जुलै महिन्यापासून या अध्यासनांना सुरूवात होणार आहे. अध्यासनांद्वारे विद्यार्थी तसेच सामान्य नागरिकांना विविध विषयांमधील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभावे हाच हेतू आहे, असे कुलगुरू डॉ. सतीश शेटये यांनी सांगितले. गेल्यावर्षी प्रायोगिक तत्वावर ही अध्यासने स्थापन करण्यात आली होती. त्यांना उत्तम प्रतिसाद लाभला, असे डॉ. शेटये यांनी सांगितले.

प्रा. माधव गाडगीळ, प्रा. सांतियागो जिरेली, मार्क टूप, शुभा मुद्गल, उस्ताद बहाऊद्दीन डगर यासारख्या दिग्गजांकडून मार्गदर्शन मिळविण्याची उत्तम संधी गोमंतकीयांना लाभणार आहे. त्याचप्रमाणे कोंकणी विभागातही नवीन उपक्रम म्हणून ॲड. उदय भेंब्रे हे दोन नियमित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकविणार आहेत. १ जुलै ते १८ सप्टेंबर पर्यंतच्या पहिल्या टर्मसाठी वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

| अध्यासन | मार्गदर्शन | दिनांक (२०१४) | स्थळ |
|---|---|---|---|
| डी. डी. कोसंबी अध्यासन– | प्रा. माधव गाडगीळ व प्रा. रोमिला थापर | २५।८ ते १।९<br>२१।८ ते २७।८ | गोवा विद्यापीठ<br>गोवा विद्यापीठ |
| दयानंद बांदोडकर अध्यासन– | प्रा. अमित भादुरी | २५।८ ते १।९ | गोवा विद्यापीठ |
| कविवर्य बाकीबाब बोरकर अध्यासन– तौलनिक साहित्य | डॉ. अरुणा ढेरे<br>जीत भाईल | फेब्रु. २०१५<br>जाने. २०१५ | राज्यभर<br>पणजी |
| मारियो मिरांडा अध्यासन– कला | ओरिजीत सेन<br>शिवा छाच्छी<br>प्रा. विद्या देहेजिया | ६।८ ते १७।८<br>१।१२ ते २०।१२<br>१९।१ ते ३१।१<br>४।९ ते १३।९<br>४।८ ते १६।८ | डीम्स कॉलेज आसगाव<br>गोवा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर<br>गोवा विद्यापीठ |
| अँथनी गोन्साल्वीस अध्यासन– पाश्चिमात्य संगीत | प्रा. सांतिआगो जिरेली<br>मार्क टूप | जुलै/ऑगस्ट<br>१।७, ३।७, ५।७, ८।७, १०।७, १२।७, २।७, ४।७, ७।७, ९।७, ११।७ (सोम, बुध, शुक्र) | मडगाव गोवा विद्यापीठ कॅम्पस<br>गोवा विद्यापीठ |
| नाना शिरगावकर अध्यासन– शास्त्रीय भारतीय संगीत | शुभा मुद्गल<br>उस्ताद बहाउद्दीन डगर | ८।९ ते १८।९<br>१८।८ ते २६।८ | सेंट्रल लायब्ररी सभागृह<br>सेंट्रल लायब्ररी सभागृह |